म. ग्रं. सं. ठाणें

विषय
चरित्र

लेखक

सन
१८७१

ालय क्रमांक
८८
१८०

पुस्तकाचें नांव मराठ्यांच्या मर्दुमकी
भाग १ १८०

८८

(चरित्र)

ग्रं. क्र. भागवध

१

"केसरी-"-"धनुर्धारी-"रचित-

महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

# मराठ्याच्या मर्दुमकी.

भाग १ ला.

महादेव गुर्जर बुकसेलर आणि

रामवाडी

मुंबई.

क्किंमत २ आणे.

मार्च सन १८९१.

( सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यांनें स्वाधीन ठेविले आहेत. )

## रूपकप्रबोध
अथवा
## नाट्यलक्षणमाला.

कि० ४ आणे, ट० ख० १ आणा.

आजपर्यंत अशा प्रकारचें पुस्तक मराठींत झालेलें नाहीं. संस्कृतामध्यें ज्यास दृश्यकाव्य किंवा रूपक म्हणतात व मराठींत नाटक म्हणतात, त्याविषयीं सर्व विवेचन ह्यांत केलेलें आहे. मराठींत सर्व रूपकांस नाटक म्हणतात, परंतु वास्तविक रंगभूमीवर जे नानाप्रकारचे खेळ करावयाचे तें रूपक, यांतील नाटक हा भेद आहे. हे २८ आहेत. नाटक, प्रकरण, भाण, व्यायोग, समवकार, डिम, इहामृग, अंक, वीथी आणि प्रहसन तसेच उपभेदः—नाटिका, त्रोटक, गोष्टी, सट्टक, नाट्यरासक, प्रस्थान, उल्लाप्य. काव्य, प्रेंखण, रासक, संलापक, श्रीगदित, शिल्पक, विलासिका, दुर्मल्लिका, प्रकरण, हल्लीश, व भाणिका यांचीं लक्षणें व उदाहरणें यांत दिलीं आहेत. ७ नायक, नायिका, ८ संबंधी पात्रें, वृत्तीचे ४ भेद, १६ अंगें, ५ अर्थप्रकृतिसंधी. १० लास्यांगें.

३३ **नाट्यालंकार.** ३६ लक्षणें या सर्वांचीं ह्यांत उदाहरणांसह लक्षणें असल्यामुळें नाटककारांस, कवींस व वाचकांस फार उपयुक्त आहे.

## रंगवल्लिका
अथवा

रांगोळी व लेणीं काढण्याचें पुस्तक. मुलींस व स्त्रियांस काढण्या सोप्या व सुशोभित अशा ३० आकृति आहेत.
कि. ४ आणे, ट. ह. १ आणा.

मराठी गद्यरूप
## श्रीमच्छंकराचार्यचरित्र.

माधवादिविरचित शंकरविजयांचे आधारानें विद्वानानें लिहिलेलें संपूर्ण चरित्र. उत्तम टाईपांनीं व डेमी द्वादशपत्री सांच्यानें छापलेलें. सोनेरी सुशोभित बांधलेलें. कि. १२ आणे, ट. ह. १ आणा.

"केसरी-" "धनुर्धारी-"रचित-

महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

# मराठ्यांच्या मर्दुमकी.

भाग १ ला.

मुंबईंत,

"निर्णयसागर" छापखान्यांत

जनार्दन महादेव गुर्जर

ह्यांनीं छापून प्रसिद्ध केल्या.

सन १८९१.

( सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत २ आणे.

रा. इ. म. ८३

# सूचना.

इतिहासविषय फार गंभीर; इतिहासलेखक म्हणजे पराकाष्ठेचा निःपक्षपाती व कडख, सत्यभोक्ता हवा; स्वाभिमान व स्वस्तुति वगैरेचा त्याला गंध नसावा, या गोष्टी मला संमत आहेत. पण अगोदर आपल्या इतिहासाबद्दल असावी तितकी माहिती व भक्ति आमच्या मंडळींत आणि त्यांतून तरुणांत दिसत नाहीं; यास्तव एकतर्फी व स्तुतिमय असे चोटकलेख लिहिण्याचें मीं पत्करिलें आहे. कारण अलीकडे आपल्या इतिहासांसंबंधानें पराकाष्ठेचें औदासीन्य दिसतें. आणि अशा स्थितींत शांत, तत्त्वज्ञानमय निःपक्षपाती इतिहासलेखकाचें चीज होणें कठीण. आपल्या देशाचा असा इतिहास हवा आहे. पण तो लिहिण्याचें सामर्थ्य या लेखकाच्या अंगीं निदान तूर्तास तरी नाहीं हें तो निरभिमानतया कबूल करितो. इतिहासाची यथेच्छ गोडी लागण्यास अशासारखे लेख बरेच उपयोगीं पडतील अशी आशा आहे. ती सफल होवो.

या लेखांत आढळणारीं व्यंगें, दाखविणारांचे आभार मजहून जास्त कोणी मानील असें वाटत नाहीं; दोषांचें अवश्य दिग्दर्शन करावें. त्याजबद्दल माफी नको, कारण दोष पाहून सुधारण्यास ठीक पडतें.

"केसरी"–"धनुर्धारी"

[stamp]

# दोन शब्द.

आपल्या पूर्वजांचा सदभिमान राष्ट्राच्या उत्कर्षास अत्याव-श्यक आहे. ज्या पूर्वजांचे अस्सल व औरस वंशज आपण ह्मणवितों त्यांचे अतुल प्रताप, त्यांच्या अपूर्व करामती, त्यांची एकंदर स्थितिगति, त्यांचे सारे आचारविचार इत्यादि यच्चयावत् प्रत्येकास अगदीं पूर्ण माहित असलें पाहिजे. कारण त्यांच्या योगानें परस्परांतील तुलना करितां येऊन सध्याची आपली अशी स्थिति कशानें, कां, आणि केव्हांपासून जाहली याचें कारण कळतें; आणि कारण कळलें ह्मणजे निवारण करण्याच्या यत्नास लागणें ठीक पडतें. शिवाय त्या इतिहासाच्या माहितीनें केवळ निराश होऊन "ललाटरेषा खरी" किंवा "प्राचीन कर्म बलवत्" अशासारखे हताश व नेभळेपणाचे उद्गार काढण्यास थोडी तरी खंती वाटेल. उद्योग करूं, दुर्व्यसनें टाकूं, मदांधपणा सोडूं, अज्ञान झाडूं आणि आपल्या पूर्वजांच्या थोरपणाकडे, त्यांच्या वैभवाकडे, त्यांच्या मर्दुमकीकडे, त्यांच्या हिम्मतीकडे आणि त्यांच्या एकंदर इतिहासांकडे थोडेंतरी लक्षपूर्वक पाहूं; ह्मणजे सर्व कांहीं साधण्याजोगें आहे, अशी त्यांची समजूत होईल. आपली अवलाद उत्तमांतली, आपला नांवलौकिक फार मोठा; आपण केलेलीं कृत्यें फार अचाट आणि जगास थक्क करून सोडणारीं, पण त्यां सर्वांवर विरजण आपल्या गुणांपैकीं कोणते गुण विशेष पाझळण्यानें पडले, त्यांपैकीं हल्लींही कांहींची मगरमिठी आपणांस आहे किंवा कसें, असेल तर ती झुगारून देऊं, अशासारखे विचार येतील. आपली सांप्रतची दुर्धरावस्था हीच पूर्वापार चालत आलेली; आ-

पणांस पूर्व कालांपासून अशा निर्लज्ज व नीच स्थितींत राहण्याचा वखत आलेला; आपण ओंगळ आणि नादान कुलांत जन्मलेले; आपल्या पूर्वापार स्थितीचा असाच कर्मविपाक; वगैरे प्रकारच्या समजुती दूर होतील. व आपल्या अंगांत खळाळणारें रक्त शत्रूंस कर्दमकाळ वाटणाऱ्या, साऱ्या दुनयेस पुरून उरलेल्या, दुसऱ्यांची डाळ शिजूं न देतां त्यांवर पुनः आपला पगडा बसविणाऱ्या शहाण्या, धूर्त व शूरांच्या शरीरांतलें असें वाटून आपल्या प्रस्तुतच्या संकटावस्थेला केव्हांच पार झुगारून देण्याची करामत आपल्यांत आहे असें असून हा गैदीपणा कां ? हा आळस कोठला ? ज्ञानप्राप्तींत चुकार तट्टुगिरी कां ? वगैरे प्रश्न आपोआप सुचतील. एक होईल आणि एक नाहीं ? सर्व कांहीं होईल आणि ह्मणूनच यच्चयावत् विद्याचारसंपन्न राष्ट्रांत पूर्वजांच्या इतिहासांवर इतकीं पारायणें झडताहेत. त्यांच्या इतिहासांचें एवढें स्तोम माजलें आहे; त्यांचा अभ्यास इतका मानार्ऱ्ह व असा उपयुक्त मानला आहे. ईश्वराच्या कृपाप्रसादानें या विषयांचें अतिमहत्व मानण्यांत अतिश्रेष्ठ अशा राष्ट्रांची आह्मांस सोबत मिळाली आहे; त्याची चटक ते आपण होऊन लावीत आहेत. पण आमचें नशीब पडलें.सवाई शिकंदर. "मोतीखातर डूब गयो तों शंख लगे हात" असा आमचा कर्मविपाक. इतिहासांच्या 'सारांनीं' आणि इंग्रज इतिहासकारांच्या एकतर्फी इतिहासांनीं आमची पाठ सोडली नाहीं. लहानां थोरांस त्यांचें महत्व कळेना. वैद्याचा काढा तसा इतिहासाचा अभ्यास त्यांस वाटतो. परीक्षा द्यावयाची तर इतिहास घोकपट्टीस घ्यावा असें बाळकडू त्यांस मिळालेलें; यामुळें असल्या उपयुक्त विषयाची अवहेलना होते आणि त्या अवहेलनेमुळें इतिहास 'संग्रह' जागच्याजागींच पडून असून नसल्या-

सारखे होतात. त्या 'संग्रहा'चा भोक्ता कोणीच मिळत नाहीं असें जाहलें आहे. "संग्रहकार" हताश होत्साते स्वकर्तव्य पराङ्मुख बनतात. याचें कारण 'संग्रहां'तील रत्नांचे पारखे कोणी नाहींत व त्या रत्नांची योग्यता कळवून देणारे भेटत नाहींत हेंच होय. **वैडुर्यादि** हेमरत्नांनीं भरलेला कोश पाहून लोभ सुटत नाहीं व त्याबद्दल पर्वा देखील दिसत नाहीं, असा– प्रकार असेल तर तो दोष कोणावर ? तोच न्याय या ठिकाणींही असो. आह्मां महाराष्ट्रियांच्या पूर्वजांनीं पूर्वी ह्मणजे कृतद्वापारादि युगांत नव्हे, तर नुक्त्या शंभर सवाशें वर्षांखालीं जे कांहीं आपले अतुल प्रताप दशदिशा या समग्र भरतभूंत गाजविले, त्यांची आह्मां त्यांच्या वंशजांस वार्ता नसावी ही गोष्ट खरोखर फार शर्मेची. तेव्हां ती लाजिरवाणी स्थिति आमच्या देशबंधूंच्या वांट्यास आलेली अंशतः तरी दूर करावी ह्मणून त्यांच्या मर्दुमकीची थोडीबहूत माहिती प्रथमतः देऊन ती मानवेल तर जास्त पुढील खेपेस द्यावी असा संकल्प केला आहे. मराठे ह्मणजे आजकालचे शूर पठ्ठे नव्हत. त्यांनीं अलीकडच्या शेंदोनशें वर्षांतच आपली समशेर गाजविली असेंही पण नाहीं. हिंदुपद पातशाह्या **श्री शिवछत्रपती** पूर्वी देखील मराठ्यांनीं आपली अपूर्व करामत पुष्कळांस दाखविली आहे. पण ती गोष्ट किंचित् प्राचीन काळची ह्मणून टाकाऊ नव्हे. पण अगदीं ताजीं ताजीं उदाहरणें आहेत तीं अगोदर कळवून मागाहून तीं देऊं ह्मणून "मराठ्यांच्या मर्दुमकीचे" पोंवाडे गावयाचे ते अगदीं प्राचीन काळचेच घेऊं. मराठ्यांच्या मर्दुमकी **हैदराबादकर निजाम** आणि **म्हैसूरकर हैदर, टिपू** यांच्यावरच फार झाल्या तेव्हां त्या संबंधानेंही अगोदरपणा पत्करला पाहिजे, कारण हैदराबादकर **निजाम** ह्मणजे अशातशांतले नव्हत. जा-

तीनें कडवे, दौलतीनें मोठे, साऱ्या भरतखंडावर बादशाही इभ्रत भोगणाऱ्यांच्या जातीचे, तालमेंत वाकब जाहलेले असे; शिवाय **इंग्रज फ्रेंच** असलालीं राष्ट्रें "गोष्टी सांगेन युक्तिच्या चार" ह्मणून विडा उचलून पाठीशीं उभीं राहिलेलीं. आ-णखी अशांवर देखील मराठ्यांनीं नकशा केला, आपला हेका तडीस नेला, आपलें सार्वभौमत्व त्यांजवर स्थापलें तेव्हां त्या खऱ्याखुऱ्याच 'मर्दुमकी' होत. त्या इत्थंभूत सांगावयाचें म-नांत योजिलें आहे. तें काम चांगल्या रीतीनें तडीस जाऊन इच्छित हेतु साधो अशी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. ती पूर्ण होवो.

**टीप**—या लेखांतलीं अवतरणचिन्हांतर्गत वाक्यें "काव्येतिहास-संग्रहां"तून घेतलीं आहेत.

# मराठ्यांच्या मर्दुमकी.

'मराठे' ह्मणजे महाराष्ट्रदेशांतील मराठी भाषा बोलणारे लोक. मग ते ब्राह्मण असोत शूद्र असोत, किंवा कोळीमाळी असोत. महाराष्ट्र देश कोणता हें सर्वांस माहित आहेच. श्री शिवाजी राजानें मराठी राज्याची मूळ प्राणप्रतिष्ठा केली. आणि पेशव्यांनीं ह्मणजे श्री शिवछत्रपतिवंशजांच्या अंकित नौकरांनीं त्यास सार्वभौमत्व जोडलें. शिवसंतती आणि पेशवे ह्या व्यक्ति भिन्न नव्हत. त्यांचा स्वामिसेवक संबंध ह्मणून पेशवे आणि सातारकर असें ह्मणतां येत नाहीं. 'मराठे' या शब्दानेंच सर्वांचा समावेश होतो.

आतां हैदराबादकर निजामुल्मुलुख यांची माहिती. दिल्ली बादशहाची दक्षिणेंतील सुभेदारी पहिल्यांदा पत्करून यजमानाचा अंदाधुंदी कारभार वगैरे पाहतांच चिनकिलीचखान ऊर्फ निजामुल्मुलुख यानें धन्यांचें सर्वस्व बळकावलें आणि एका स्वतंत्र व सुपीक राष्ट्राची स्थापना केली. पेशव्यांनीं स्वतंत्र कारभार पुष्कळ केला व धन्यापेक्षां बडेजावीही बहुत वाढविली पण आपण सेवक आहोंत आपणांस त्यांजकडून अधिकार-वस्त्रें घेतलीं पाहिजेत हें ते विसरले नाहींत. आपला शिक्कामोर्तब शिवसंततीच्या नांवानें आणि वरपांगीक परवानगीनें ते चालवीत. तशी गोष्ट निजामुल्मुलुखाची नव्हती. धन्याचा धनीपणाच त्याला वरपांगीसुद्धां कबूल करवेना. ह्मणून दिल्लीकर बादशहाचें व यांचें वैमनस्य फार आलें. बादशहाच्या मनांत आपल्या या आडदांड नौकरास चांगलें प्रायश्चित्त द्यावें आणि इकडे निजामुल्मुलुखाच्या म-

नांत आपल्या धन्याला धाब्यावर बसवावें. पण हें साधणार कसें ? धनी जबरदस्त. आपण खरे अपराधी. तेव्हां कोणाचें तरी सहाय्य घ्यावें तरच आपला निभाव लागेल हें **निजामुल्मुलुखानें** पक्कें जाणलें. दक्षिणेंत सहाय्य करणारे काय ते एकटे मराठे. इतरांची प्राज्ञा नाहीं. **शाहुराजा** नुक्ताच दिल्लीहून **साताऱ्यास** आला होता. शिवाय घरच्या तंट्याची भलीवाईट त्यानें व्यवस्था लावून फत्ते मिळविली होती. त्याजवर **दिल्लीदरबारच्या** मंडळीचें प्रेम असून तेथें **शाहूचें** वजनही बरेंच होतें. तेव्हां **शाहूचें** सहाय्य मागणें एवढाच काय तो **निजामुल्मुलुखास** तरुणोपाय वाटला. आणि येथून मराठे व मोंगल यांचा संबंध जुळला ह्मणावयाचा. याच्यापूर्वीं एकवार मराठ्यांनीं याच **निजामुल्मुलुखाशीं** थोडी कटकट मांडून त्याला आपली मर्दुमकी दाखविली होती. पण त्यावेळीं **निजामुल्मुलुख** दिल्लीबादशहाच्या पदरचा ह्मणवीत असे. तेव्हां ती मराठ्यांची मर्दुमकी दिल्लीबादशहावरच झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

१ **निजामुल्मुलुख** दक्षिणेंतल्या सुभ्यावर असतांच स्वतंत्र होण्यास इच्छूं लागला. त्याजकडून "दहापांच वर्षें दक्षिणेचे मुलखाची रसद दिल्लीस पोहोंचली नाहीं व हिशेबही नाहीं." यामुळें पादशहाची मर्जी फार खप्पा जाहली आणि त्याचें योग्य शासन करावें या हेतूनें भली दांडगी फौज दिल्लीहून निजामावर निघाली. "निजामुल्मुलुख यास कैद करून आणावें" हा हुकूम दिल्लीपातशहानें दिला होता. हें वर्तमान **निजामुल्मुलुखास** कळलें तेव्हां तो घाबरला आणि **साताऱ्यास श्री शाहू** महाराजांकडे कुमक मागण्याकरतां वकीलांची त्यानें रवानगी केली. वकील **साताऱ्यास** दाखल जा-

हले. पंचवीस हजार सैन्य हवें, पण तें साताऱ्यास नव्हतें. दरबारच्या मंडळीस **शाहुराजांनीं** "पुढें याची तजवीज कशी? व याची मसलत कोणीं करावी" ह्मणून प्रश्न केला. त्यावर प्रतिनिधी आदिकरून सर्व मंडळी माघारी कुचर खाऊं लागली. दम कोणाचाच निघेना. असा प्रसंग आणीबाणीचा आला. कारण कुमक न द्यावी तर "राज्याचा आव जातो" सर्वांस काळजी पडली. यावेळीं **बाळाजी विश्वनाथ** पेशवे वारले होते. त्यांचे चिरंजीव **बाजीराव.** पण त्यांस वस्त्रें देण्याचें टाळवेल तितकें टाळावें हा विचार इतर दरबारच्या मंडळीचा. **साताऱ्यास बाजीराव** केव्हां राजाची मर्जी प्रसन्न होते आणि कसा पेशवाईचा अधिकार मिळतो ह्मणून वाट पाहत बसले होते. हा प्रसंग त्यांचे पथ्यावर पडला. पेशव्यांचे कारभारी **आबाजी पुरंदरे.** त्यांस **शाहूनें** दरबांत आणविलें आणि विचारिलें "मोंगलांकडील वकील आला आहे तो आमची फौज पंचवीस हजार कुमकेस मागतो; तेव्हां तुमच्यामध्यें मोंगलांस कुमक जाण्याची हिम्मत आहे किंवा नाहीं हें सांगावें." त्यास **आबाजीपंतानें** उत्तर दिलें "आह्मी सरकारचे चाकर जिकडे हुकूम होईल तिकडे जाणें भाग. एवढीं वस्त्रें—पेशवाईचीं बाजीरावाच्या अंगावर पडलीं ह्मणजे आह्मांस कोणे गोष्टीचा तोटा नाहीं." हा मजकूर ऐकतांच **बाजीरावास** प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं आणि **आबाजीपंतास** प्रश्न केला तसाच **बाजीराव** यांस केला. तेव्हां **बाजीराव** बोलले "मोंगल ह्मणजे काय? आज्ञा जाहली असतां मोठ्या काळाच्या तोंडांत देखील जाऊन सरकारचे पुण्य प्रतापेंकरून त्याचा बंदोबस्त करून येऊं." हें ऐकून **शाहूराजे** खुष झाले. **बाजीरावानें** सांगितलें कीं, फौज पाठवून देतों असें सांगून वकिलास रवाना करावें, मी

चाललोंच पाठोपाठ. नंतर **बाजीरावानें** दोन लाख रुपये कर्ज काढून सैन्याची भरती करण्यास सुरवात केली आणि नंतर सर्व फौजेनिशीं मोंगलांच्या राज्यांत **बाजीराव** दाखल झाले. सैन्य कसें काय आहे हें पाहण्यास **निजामानें** गुप्त हेर पाठविले होते. त्यांनीं कळविलें कीं फौज नादान; तेव्हां **निजामास** शंका आली. त्यानें **बाजीरावाचे** कारभारी **पुरंदरे आबाजीपंत** यांस बोलावूं पाठविलें आणि विचारिलें, ही हकीकत खरी किंवा कसें. आबाजीनें ह्मटलें होय. आह्मांला द्रव्याची तूट सबब थोडीशी आमची फौज खराब आहे. पैशाचें तेवढें सहाय्य करा ह्मणजे आमच्या फौजेची बरावरी कोणासच यावयाची नाहीं. हें ह्मणणें **निजामानें** कबूल केलें आणि पन्नास लाखांचा ऐवज **बाजीरावाच्या** स्वाधीन केला. **बाजीरावानें** आपलें सैन्य पक्कें मजबूत हां हां ह्मणतां केलें. नंतर **आबाजीपंतानें** नबाबास सांगितलें कीं आपणांस कैद करून नेण्याकरतां बादशहाचें सैन्य येत आहे तर त्यास आपण दिल्लीकडे स्वतः निघून जाण्याची तयारी करा. फौजफांटा थोडाच बरोबर असूं द्या. तुमच्या पाठीशीं लगट करून आह्मी येतों. पुढला मनसुबा पुढें पाहूं. त्याप्रमाणें निजामानें कबूल केलें. पुढें निजाम मागें मराठे या थाटानें मजलदरमजल कुच करीत **चंबळा**नदीच्या तीरापर्यंत येऊन सर्व लटांबर थडकलें. तेथें बादशाहाच्या सैन्याची व निजामाची गांठ पडली. दिल्लीहून आलेल्या सरदारांनीं निजामास ह्मटलें "तुह्मी असे 'बदमस्त' कां ? दहादहा वर्षांपर्यंत पातशहाची गांठ नाहीं व ऐवजही नाहीं अशी मस्ती पातशहाबरोबर चालेल कीं काय ?" त्यावर निजाम बोलला:—"हल्लीं बंड आमचे पाठीवर येत आहे. अशीं अशीं बंडें दक्षिणेंत हरदम. नेहमीं लढाईशीं

गांठ. तेव्हां या बंडांचा बंदोबस्त करावा किंवा पातशहाचे भेटीस यावें ? असा नित्य उठून दंगा. असो. हल्लीं आमचे पाठीवर बंड येत आहे याचा आतां बंदोबस्त करावा." इतक्यांत **बाजीराव** येऊन धडकले. दिल्लीकरांची व श्रीमंतांची लढाई जुंपली आणि त्यांत **बाजीरावांस** फत्ते मिळाली. बादशाही फौज पळत सुटली आणि मराठ्यांनीं तिचा पाठलाग केला तो दिल्ली गांठेपर्यंत सोडला नाहीं. दिल्लीस गेल्यावर तेथेंही मराठ्यांनीं धामधूम पुष्कळ मांडली. पातशहाचें व निजामाचें बोलणें चालणें जाहलें. त्यांतही बंडाचा बंदोबस्त राखण्याखालीं बेजार झालों होतों यामुळें इकडे हुजूर येणें होत नाहीं "हल्लीं हें बंड आलें आहे. हुजूरची फौज गेली होती त्या फौजेचा मोड होऊन फौज पळून माघारी आली आहे त्याचा बंदोबस्त सरकारांनीं करावा" असें **निजाम** बोलला. या **निजामुल्मुलुखाच्या** अर्जाचें प्रत्यंतर ताबडतोब पातशहास आलें. तेव्हां त्यानें निजामास हुकूम केला कीं "**बाजीराव** याची समजूत पाडून वाटेस लावलें पाहिजे." **निजामुल्मुलुखानें बाजीरावाशीं** बोलणें तहाचें चालविलें तेव्हां "आमचा स्वारीखर्च काय जाहला असेल तो द्यावा आणि पातशहाचा मुलुख आहे इतक्याच्या सनदा बाबती सरदेशमुखी व चौथाई मोकासा या अमलाच्या **शाहूमहाराज** छत्रपती यांचे नांवें करून द्याव्या" ही अट **बाजीरावानें** घातली ती बादशहानें कबूल केली आणि मराठ्यांस एकदांचें वाटेस लाविलें !

२ इतकें जाहलें तरी पुनः **निजामुल्मुलुखानें** दंडेलगिरी मांडली. त्याचें पारिपत्य करावें म्हणून बादशहानें **शहाजानखान** नामें शूर सरदाराला दक्षिणेंत रवाना केलें. तो प्रसंग पाहून शाहूराजांकडे निजामानें पुनः संधान बांधलें. **बाजीराव**

बल्लाळ यावेळीं पेशवे. ते **बुंदेलखंडांत छत्रसाल** राजाकडे गेले होते. अशावेळीं निजामाकडून सहाय्य मागणें जाहलें तेव्हां छत्रपतीस फिकीर पडली कीं आतां कसें करावें ? अब्रू जाण्याचा वखत आला. त्यावेळीं सातार्‍यास **बाजीरावाचे** बंधू **चिमणाजी अप्पा** होते. त्यांनीं ही छत्रपतीची फिकीर जाणून ह्मटलें "मजला आज्ञा होईल तर मी जाऊन मोंगलांस कुमक करीन" तेव्हां छत्रपती बोलले तुह्मी ह्मणतां तें खरें पण सर्व सरदार दरकदार बाजीरावांबरोबर हिंदुस्थानांत गेले आहेत तेव्हां सैन्याची तजवीज काय करणार ? याला **चिमाजी अप्पानें** उत्तर दिलें "जे सरदार गेले त्यांचे लेंक, पुतणे, भाऊ पाठीमागें आहेत. त्यांजला घेऊन मी जातों." हें ह्मणणें **शाहूस** पटलें. आणि त्यांनीं **चिमाजी अप्पाला** जाण्यास परवानगी दिली. स्वारी बरोबर पंचवीस हजार सैन्य घेऊन निघाली. ती **निजामुल्मुलुखाकडे** न जातां **दिल्लीहून** आलेल्या सरदाराकडेच थेट गेली; आणि **शहाजानखान** याची जाऊन भेट घेतली. त्याणें विचारलें "तुह्मी कोण आहां." तेव्हां **अप्पांनीं** उत्तर दिलें "मी बाजीरावांचा धाकटा भाऊ आहें. बाजीराव राजांकडे चाकरीस आहेत. त्यांचें आमचें बनत नाहीं. ह्मणून दुसरी निराळी चाकरी पहावयास निघालों आहों. तुह्मी ठेवाल तर आह्मी राहूं." हें **शहाजानखानास** बोलणें खरें वाटलें. त्यानें **चिमाजी अप्पांस** चाकरीसही पण ठेविलें. सैन्याच्या खर्चाला ऐवज दिला. अशा रीतीनें गनीम आपल्या सैन्यांत ठेवून घेण्यांत शहाजानखानानें व्यर्थ आपला दगा मात्र करून घेतला. सैन्य व खानसाहेब बेसावध आहेत अशी संधि मिळतांच चिमाजीनें आपल्या सैन्यास इषारा दिला. त्या बरोबर शहाजानखानांच्या कंपूंत कापा-

कापी सुरू होऊन चिमाजीची फत्ते जाहली. शत्रूची पुरी दाणादाण उडविणें **चिमाजीनें** अशा प्रकारें साधून घेतलें ? खानाच्या सैन्यांतील कांहीं शिपाई उरले त्यांस आपण पुनः नौकरीस घेऊन नंतर **चिमाजीनें** आपला मोर्चा **निजामाकडे** वळविला. "तुमच्या ह्मणण्याप्रमाणें तुमच्या गनीमाचें पारिपत्य केलें. आतां आमचा स्वारीखर्च व आह्मांस काय देतां तें सांगावें; नाहीं तर तुमचें ठिकाण आह्मी घेऊं." असा **चिमाजीचा** निरोप ऐकून बिचारा **निजामुल्मुलुख** निरुत्तर जाहला. एकंदर स्वारीखर्च व **दौलताबाद** किल्ला **बीड, पाथरी** इत्यादि साठ लक्षांचा मुलुख निमूटपणें स्वाधीन करून निजामानें ही ब्याद टाळिली.

ही गोष्ट हल्लीं प्रसिद्ध असलेल्या इतिहासांत आढळत नाहीं. काव्येतिहास संग्रहांतील बखरींत आहे. तेव्हां ती खरीच असें धरून चालणें गैर नव्हे.

३ यानंतर **बाजीराव** हिंदुस्थानांतल्या मोहिमेवर जाई त्यावेळीं हैदराबादकरांनीं वाटेंत त्यांला आडवावें आणि आपला पराभव करून घेऊन त्यांशीं तह करावा हा प्रकार तीन चार खेपा जाहाला. पण त्यांत विशेष महत्व नाहीं ह्मणून त्यांचें वर्णन नको.

४ **बाजीराव** कैलासवासी जाहल्यावर **नानासाहेबांस** पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. वडिलांनीं बहुत प्रताप गाजविला त्या मानानें आपण कांहीं तरी गाजवावें अशी यांची इच्छा फार होती. शिवाय सभोवतीं आपला मुलूख आणि मध्येंच निजामाचा एवढा नगरचा किल्ला कशाला ह्मणून बाजीरावानें मागे फंदफितूरी करून तो किल्ला हस्तगत केला होता. पण नाइलाजास्तव डोळ्यावर कातडें ओढून तो प्रकार निजामानें

त्या वेळीं सहन केला. पण आतां **बाजीराव** गुदरले तेव्हां त्यांच्याबरोबर केलेल्या तहांत कमीउणें पडलें तर त्यांत काय हरकत आहे असा विचार नबाबास येऊन त्यानें पेशव्यांशीं उघड विरोध केला. सरदेशमुखी, चौथाई वगैरे वसुलांत हरकत येऊं लागली. **दौलताबादचा** किल्ला पेशव्यांकडे होता तो नबाबानें परत घेतला. तेव्हां नबाबाचें पारिपत्य करावें हा विचार पेशव्यांनीं केला. **सदाशिवरावभाऊंनीं** ही मोहीम स्वत: पत्करिली. जिकडून तिकडून सैन्य तयार होऊं लागलें आणि नंतर **उदयगिरीजवळ** मराठ्यांच्या सैन्यांचा तळ पडला. ही पेशव्यांची तयारी पाहून मोंगलांनीं ही आपली कंबर बांधिली. दोनी सैन्यें समोरासमोर समरांगणीं सज्ज होऊन थडकलीं. लढाईचें तोंड जुंपलें. मोंगलांनीं शर्थ केली. श्रीमंतांचे फौजेनें कच खाऊन घेतला माघार. आणि निजामानें केला पाठलाग. श्रीमंतांचें सैन्य पळत सुटलें. आपण आज फत्ते मिळविली ह्मणून निजामास गर्व चढला. पाठीशीं शत्रूला घेऊन मराठे चार एक कोस मागें आले आणि जागा सोइस्करशी पाहतांच आपली पाठ फिरवूनच मोंगलांवर मराठे उलटले. मोंगल जयोत्सवांत दंग आणि असा एकाएकीं मारा सुरू जाहला तेव्हां दचकले फार. हातघाईवर प्रसंग आला. तोडातोडीची शिकस्त जाहली. एकप्रहर पर्यंत उभयतांचा प्रसंग घनघोर माजला, तेव्हां अखेर निरुपायास्तव मोंगलांना पळ काढावा लागला. खुद्द नबाब सुद्धां सैन्य वाट फुटेल तिकडे सैरावैरा पळूं लागले. श्रीमंतांच्या सैन्यानें मग पाठलाग सोडिला नाहीं. सुमारें ७।८ कोस गेले तरी पाठीवर मराठ्यांचें सैन्य होतें तें फिरेना; त्यामुळें मोंगलसैन्याची अगदीं दाणादाण उडून पांचांवर धारण बसली. शत्रूंची समशेर आणि

अन्नापाण्याचा उपासमार, या खालीं **निजाम** फार बेजारीस आला तेव्हां तहाखेरीज अन्य उपाय मोंगलांस कोणताच सुचेना. पेशव्यांकडे वकील पाठविला. तहाचें बोलणें होणार ह्मणतांच थोडासा जीव मोंगल चैत्यास आला. त्यांनीं तळ दिला तेथेंच मराठ्यांनीं आपला दिला. दोहोंकडील वकील खलबतें करूं लागले. **भाऊसाहेबांचा** हट्ट फार. वकीलांचें कांहीं चालेना. सर्व घडी विघडते असें वाटूं लागलें. तेव्हां नबाबानें "आपला शिक्का मोर्तब भाऊंकडे पाठविला. अशा अर्थानें कीं जो मुलुख आपण घ्याल तो घ्यावा व जें आह्मांस ठेवाल तें आह्मीं घेऊन राहूं" असें ह्मणून अखेरीस लाखाचा मुलुख व स्वारीखर्च घेऊन पेशव्यांनीं आपलें सैन्य माघारी फिरविलें. पुढें नबाब माघारे गेले ते **औरंगाबादेस** पोहोंचले. पोंचल्यानंतर नबाबांनीं आपल्या ठिकाणीं विचार केला कीं, "येथें राहिलें असतां नित्य उठून पेशवे यांचे दंग्यांत येववत नाहीं ह्मणून **औरंगाबाद** उजाड टाकून नबाब जाऊन **हैद्राबादेस** राहते जाहले." अशा प्रकारें नबाबांस दहशत पेशव्यांची पडली खरी, पण त्यानें आपला मूळस्वभाव कांहीं सोडला नाहीं. पानिपतच्या मोहिमेवर मराठ्यांचें सैन्य जाऊं लागलें तेव्हां ही स्वारी आड आली होतीच. पण "ती लढाई फत्ते करून मोंगलापासून खंडणी घेऊन" स्वारी पुढें चालली तेव्हां **निजामअल्ली** पुनः स्वस्थ बसले.

५ पानीपतीं सैन्याची भयंकर गारत जाहली त्या अपमानकारक शोकामुळें **नानासाहेब पेशव्यांची** कंबर खचली आणि त्याच हृद्रोगामुळें त्यांनीं राम ह्मटलें! पुढें त्यांचीं वस्त्रें वडील चिरंजीव **माधवराव** यांस मिळालीं. राघोबा दादा हे चुलते आणि माधवराव पुतणे; यांचें बनेना. कलहाग्नि तेव्हां-

पासून धुमसूं लागला तो, **नारायणरावांची** आणि नंतर समग्र पेशवाईची आहुति घेईपर्यंत शमला नाहीं. मागें **उदयगिरीची** ज्यास, मराठे तांदुळजाची लढाई ह्मणत त्यामुळें आपणांस मोठी शरम आली ती काढून टाकावी ह्मणून **निजामाचे** मनांत फार खुमखुम होती. आतां आपसांत कलह लागला ही संधी बरी वाटून कुरापती उकरून काढण्यास **विठ्ठल सुंदर** नामक निजामाच्या मंत्र्यानें सुरवात केली. **राघोबादादा** आणि **माधवराव** यांच्यांत बेबनाव झाला तेव्हांच **निजामानें** आपलें घोडें पुढें ढकललें होतें. त्या वेळेस सत्तावीस लाखांचा मुलुख पेशव्यांनीं तोंडावर टाकून त्यास गप्प बसविलें होतें. **माधवराव, दादांस** शरण गेला तेव्हां दोघांत एकोपा जाहला; पण **राघोबाच्या** तर्फेची मंडळी पेशव्यांशीं वैर करण्यास तयार जहाली होती त्यांचीं मनें मात्र दुखविलीं. **विंचूरकर पटवर्धनादि** मंडळीनें **दादांकडून** प्रथमतः कलमबंदी लिहून घेतली आणि नंतर **माधवरावांविरुद्ध** पक्षास ते मिळाले; पण पुढें उभयतांत समेट जाहला तेव्हां सरदार लोकांस भीति वाटली व पश्चाताप पुष्कळ जाहला. **विठ्ठल सुंदर** निजामाचा मुख्य दिवाण, साडे तीन शाहाण्यांतला. त्यानें ही संधी साधून त्या सर्व सरदारांस आपलेसें करून घेतलें. इतमाम आदरातिथ्य वगैरे इलाजांनीं ती मंडळीही **निजामास** अनुकूळ प्रथमतः जाहली. इतक्यांत पुनः कुरापती निघतील तर फत्ते आपली, असा भरंवसा **निजामास** आला ह्मणून त्यांनीं तंटे काढण्यास कमी केलें नाहीं. **राघोबादादा** ह्मणजे अप्रतिम शूर. शत्रूचा जसा काय काळ. त्याला वाटलें **निजाम** हरदम अशा कटकटी काढतो तर त्याची पुनः खोडकीच मोडली पाहिजे. ह्मणून स्वारीची जय्यत तयारी करून निजामा-

वर चालून जाण्याचा मनसुवा कायम केला. विठ्ठल सुंदरचा भरंवसा, फार दिवसांचें उसणें आज फेडून घेऊं आणि पेशव्यांची चांगली खोडच मोडूं. तो जातीनें लढाईस पुढें उभा राहिलेला. इकडे दादासाहेब सर्व सरंजाम घेऊन निघाले. उभय पक्षांची गांठ राक्षसभुवन ह्मणून गोदावरी तीरीं एक गांव आहे तेथें पडली. माधवराव नृपतीस नजर कैद करून बरोबर घेतलें होतें. पंधराशें स्वारांचा पहारा ठेवून दोन कोस मागेंच माधवरावांस सोडलें व स्वतः दादा शत्रूवर चालले. दारू पिऊन मस्त जाहलेल्या हत्तीवर स्वार राघोबा जाहले आणि लढाईची मोठी शिकस्त केली. तिकडे विठ्ठल सुंदर आणि इकडे राघोबा. नवाबाची फौज नव्वद हजार तिनें एकदम लगट केला. त्यासरशीं मराठ्यांच्या सैन्यानें कच खाल्ली, सैरावैरा वाट फुटेल तिकडे मराठ्यांच्या सैन्यानें पळ काढला. राघोबाच्या हत्तीस सांखळदंड बांधून अडकवून ठेवलें होतें. त्यामुळें तो हत्ती तेथेंच अडकून राहिला. तें पाहून विठ्ठल सुंदर जवळ आले. त्यांनीं खाशांचा हत्ती वळवून आपल्या सैन्याकडे चालविला. मराठ्यांच्या सैन्याची दाणादाण उडाली आणि फत्ते निजामास मिळाली, पण अखेर कांहीं साधली नाहीं.

हें अपजयाचें वर्तमान माधवरावांस लढाईतून पळून आलेल्या एका स्वारानें कळविलें. त्यावेळीं माधवरावांनीं विचारिलें अद्याप मला कैदेंतच ठेवणार काय ? त्याला पाहरेकऱ्यांनीं जबाब दिला सरकार, आतां कैद कोणाची आणि वखत कसला ? आपण धनी आह्मी चाकर. खावंदाच्या पायांवर आह्मीं आपले प्राण सोंपविले आहेत. तेव्हां माधवरावांनीं सांगितलें. " आतां घोड्यांच्या अनीना उचला. " त्यासरशी पंधराशें पण " दहा हजारांना भारी " अशा स्वारांची एकदम

मांड उठली. वाघ चवताळून डरक्या फोडीत त्वेषानें धांवतो तसे मराठे चालले. इतक्यांत मध्यें **माधवरावांस होळकर मल्हारराव** भेटले. **मल्हाररावांस माधवराव**-काका ह्मणत. वडिलांसमान ते त्यांना पूज्य. **मल्हाररावानें** ह्मटलें "माघारें चला, पुण्याचें राज्य करूं" तेव्हां **माधवरावांस** हें न आवडून त्यांनीं जाबब दिला, काका, **भाऊसाहेबांस** आपण मागें बुडविलें असें ऐकत होतों तें आज खरें झालें. " हा टोमणा **होळकरांच्या** वर्मी लागला. **पानिपत**च्या लढाईत फंदफितूर केल्याचा संशय **होळकरांवरही** होताच. तेव्हां **होळकरांनीं** उत्तर दिलें "बाळा! आतां चलावें आणि माझी तरवार पहावी." तेव्हां रावसाहेब आणि होळकर असे उभयतां मारा करीत सुटले. जिवावर उदार होऊन असा निकराचा मारा "प्रधानपंतांनीं" सुरू केला, तो **निजाम**च्या सैन्यास फार वेळ सहन होईना. त्यांच्या सैन्यांत **माधवरावांनीं** यथेच्छ प्रवेश करून थेट नवाबापर्यंत लगट केली. नवाब हत्तीवरील अंबारींत होते. तेथपर्यंत **माधवराव** गेले. आणि उभे राहिले व लगेच आपल्याबरोबर आलेल्या स्वारांस आज्ञा केली कीं "अंबारीचें भारकस कापा." पुढें महात होता त्यास सांगितलें कीं हत्ती खालीं बशीव. हा प्रकार पहातांच नवाबाचें धाबें दणाणलें. तोंडचें पाणी पळून, दे माय धरणी ठाय अशी त्याची अवस्था झाली. जीव वांचवावा ह्मणून खिजमतगार बसतात त्या खवासखान्यांत हुजूरस्वारी शिरली पण तेथेंही दम निघेना. तेव्हां "आह्मी आपल्या स्वाधीन होतों, हल्ला बस्स करावा" असें रुमाल उडवून नवाबांनीं दर्शविलें. तेव्हां पेशव्यांकडे शहाजणें वाजूं लागलीं आणि प्रथमतः कच खाऊन पळून गेलेली मंडळी आतां हळूहळू पुनः जमूं लागली. जरीपटकाही पुनः परत

आला. आणखी लढाई पुनरपि सुरू जाहली. मारा करीत-करीत **दादासाहेबांचा** हत्ती होता तेथपर्यंत **माधवराव** गेले. इतक्यांत **विठ्ठल सुंदर** गोळी लागून ठार झाले. **दादा-साहेबांचा** हत्ती फिरवून आणिला तेव्हां श्रीमंतांस थोडेंसें बरें वाटलें. निजाम, दांतीं तृण धरून शरण आला होताच तेव्हां त्याशीं तह करून पूर्ववत् सलोखा ठेविला. निजामाची आणि त्याजबरोबर काकांची ही पुरी खात्री करून श्रीमंत पुण्यास परतले !

६ श्रीमंत पंतप्रधान पेशवे **माधवराव** ह्मणजे महान् पराक्रमी. मोठे न्यायी आणि परम चतुर व कार्यदक्ष अशी सर्वांची खात्री होऊन चुकली. प्रजेचें पालन करण्यांत यांच्या-इतका दक्ष अन्य पेशवा जाहला नाहीं; असें जिकडे तिकडे लौकरच पसरलें. **हैद्राबादेस** एक ब्राह्मण होता त्याची जागा **रुखमत उदौला** यानें जबरदस्तीनें घेतली, त्याची दाद त्या दरबारांत लागेना. तेव्हां तो वैतागून **पुण्यास** आला. संकष्ट चतुर्थीच्या दिवशीं श्रीगजाननाच्या दर्शनार्थ श्रीमंत घोड्यावर स्वार होऊन चालले होते, ही संधी साधून ब्राह्मणानें आरोळी ठोकिली "फिर्याद" ह्मणून, ती गेली **माधवरावांच्या** कानीं. तेव्हां त्या ब्राह्मणास श्रीमंतांनीं जवळ बोलावून सर्व हकीकत ऐकून घेतली आणि आज्ञा केली कीं, सरकारवाड्यांत येऊन भेटा. मिरधे, खिजमतगार यांस या ब्राह्मणास आंत सोडावें ह्मणून फर्माविलें. आणि स्वारी पुढें चालती जाहली. पुढें ब्राह्मणाची सर्व हकीकत खाशांनीं ऐकून नबाबाचे वकील **धोंडो रामपंत** ह्मणून होते, त्यांस आज्ञा केली "ह्या ब्राह्मणाची जागा तुमचे दिवाण जबरदस्तीनें घेतात ह्याविषयीं तुह्मी नबाबांस पत्रें लिहून भटजीची जागा भटजीस देववावी हें चांगलें."

त्याला वकीलानें "पत्र लिहून जाब आणवितों" अशी विनंती केली. त्यावेळेस श्रीमंतांनीं विचारलें, "किती दिवसांत जाब येईल." तेव्हां वकील यांनीं कबूल केलें कीं "आठ दिवसांत जाब येईल." पण आज उद्यां करतां करतां एक सबंध महिना लोटला, उत्तर आलें नाहीं. तेव्हां वाट पाहून ब्राह्मण थकला. श्रीमंत गणपतीदर्शनास पुनः चालले, तों वाटेंत भटजीनें पुनः गांठून "फिर्याद" "फिर्याद" ह्मणोन आरोळी ठोकली. श्रीमंतांनीं ब्राह्मणास जवळ बोलावलें. तेव्हां ब्राह्मण ह्मणाला "आज महिना जाहला; वाट पाहिली; आतां ब्राह्मण्य बुडालें ह्मणून वाट फुटेल तिकडे जातों. "हें ऐकून श्रीमंतांनीं आज्ञा केली "तुह्मी येथेंच स्वस्थ बसा. मी देवदर्शन करून माघारा आल्यानंतर तुमचा बंदोबस्त होईल. कांहीं चिंता करूं नये." सरकारस्वारी परत आली आणि लगेच श्रीमंतांनीं पागे **रामचंद्रपंत** यांस हुकूम दिला कीं "तुह्मी येथून मोंगलाई मुलखांत चलावें. जेथून मोंगलाई लागेल तेथून दिवे लावण्याचा—ह्मणजे अगदीं उजाड—कौल देत असें करावें." व मागाहून १०।१५ हजार फौज रवाना केली. सर्वजण मिळून मोंगलाई प्रांतांत धामधूम करीत सुटले. फार नासाडी मांडली. वर्तमान नबाबांस कळलें, तेव्हां आपल्या वकीलास पुण्याला नबाबानें पत्र लिहिलें कीं "रावपंतप्रधान यांचा आमचा बिघाड नसतां आमचे मुलखांत त्यांची फौज येऊन उपद्रव दिला; याचें कारण काय असेल तें तुह्मीं त्यांस विचारून लिहून पाठवावें." त्याप्रमाणें सर्व हकीकतीचीं पत्रें परभारें वकीलाकडून गेलीं तेव्हां "ब्राह्मणाच्या जागेसाठीं इतकी धामधूम केली याचा विचार काय." त्यावर निजाम सरकारच्या वकीलांनीं नबाबांस पुनः लिहिलें कीं त्याविषयीं दोन चार वेळां आपलेकडील वकी-

लांनीं मजकूर लिहून कळविला, परंतु तीं पत्रें मध्येंच दाबिलीं, आपणांस मजकूर जाहीर केला नाहीं." नबाबांनीं दिवाणास बोलावून विचारलें तेव्हां त्यानें सर्व कबूल केलें. श्रीमंतांस नबाबांनीं कळविलें "त्या भटजीचा बंदोबस्त आह्मी करून देतों." इकडे पेशवेसरकाराकडून आपल्या वकीलास उलट जबाब गेला कीं "ब्राह्मणाची जागा ब्राह्मणास द्यावी. फिरोन त्याचे सरकारांतून या ब्राह्मणास कोणेएके गोष्टीचा उपसर्ग येऊं नये; काळ आमचा कमजोर आला असतांही ब्राह्मणास उपद्रव लागूं नये असें नबाब यांजपासून कुराण उचलून घ्यावें व फौज आमची गेली आहे त्याचा खर्च ते आपल्या संतोषानें काय देतील तो घ्यावा ह्मणजे फौज माघारी बोलावून घेऊं." आणि त्याप्रमाणें नबाबखांनीं सर्व कबूल केलें. पांच लाख स्वारी खर्च देऊन ब्राह्मणाची जागा ब्राह्मणास देवविली!

७ केवळ स्त्रैण बुद्धीनें **राघोबा भरारी** यांनीं, प्रत्यक्ष आपल्या पुतण्याचा खून खुद्द राजवाड्यांत भरदिवसाढवळ्या केवळ राज्यप्राप्तीकरतां, करविला आणि त्या आपल्या दुष्कर्माचें निशाण "यावच्चंद्रदिवाकरौ" फडकत ठेविलें. आणि ज्याखातर असलीं राक्षसी आणि अनन्वित कृत्यें केलीं तेंहीपण त्यांच्या फुटक्या नशीबानें साधलें नाहीं; ह्मणजे पुतण्याच्या घातानें मिळवलेली मसनद बाणेदार मुत्सदीमंडळीनें त्यांस पचूं दिली नाहीं. नानाप्रकारचें कारस्थान रचून **राघोबाच्या** नाकावर **सवाईमाधवराव** ह्मणून पंतप्रधान उभे करून ठेविले. पण **राघोबा** ह्मणजे मोठा रणधुरंधर आणि महत्वाकांक्षेच्या जबरदस्त तावडींत सांपडलेला तो सुखासमाधानानें गोत्रज, वंशज व आत्मज-हत्या करवून मिळवलेली पंतप्रधानकी सोडतो थोडीच. **हरीपंत फडके, त्रिंबकराव पेठे, नाना फडणीस** वगैरे

मंडळीनें दादासाहेबांला एकदां आपल्या ताब्यांत घ्यावें ह्मणून जंगजंग पछाडिले. पण राघोबा शिपाई गडी, तेव्हां त्यानेंही जरा ओढूनच धरिलें. आपला परिवार घेऊन तो दुसऱ्याकडे कुमक मागावयास गेला, तेव्हां त्याला मध्येंच अटकवावें ह्मणून पुण्याच्या कारस्थानी मंडळीनें आपलेंही सैन्य राघोबाच्या मागें लाविलें. आपल्या सैन्यास मदत हैद्राबादकर नवाबानें करावी असें संधान फडणीस नानांनीं बांधिलें आणि त्याप्रमाणें होय नाहीं करितां करितां स्वारीखर्च व थोंडेंबहुत बक्षीस कबूल करून निजामानें सहाय्य देण्याचें कबूल केलें. आणि याप्रमाणें पुणें दरबारी मंडळी व निजाम यांच्या सैन्यानें दादांस एकेठिकाणीं ( महेश्वर—वऱ्हाडांत–) तोंड दिलें. त्यांत राघोबाचा पराभव झाल्यामुळें त्यानें पळ काढिला. मागें सैन्य या मंडळीचें लागलें. इतक्यामध्यें नवाबानें हरकत काढिली कीं "हम तुमारेसाथ नै आते;" कारण "दादासाहेब लढवाई असता तर कां पळता ? आह्मी याचे मागें लागत नाहीं" त्यावेळीं मराठा बाणेदार ब्राह्मण शिपाई ताात्या यानें उत्तर दिलें "तुह्मी आमच्या समागमें येत नाहीं तर चिंता नाहीं. आमचा घरचा कलह आहे. याची आह्मी कांहीं चिंता करीत नाहीं. तुह्मीं मात्र आपले ठिकाणीं मजबूत रहावें. आह्मी व दादासाहेब एकत्र होऊं. ते आमचे खावंद आहेत. आह्मांवर कांहीं परचक्र आलें असें नाहीं. ते आह्मी एकत्र होऊन तुह्मांवर येऊन याचा सूड घेऊं". तेव्हां निरूपायास्तव नबाबखां दादासाहेबांच्या पाठीमागें लागले. एके ठिकाणाहून दुसरे, दुसऱ्याहून तिसरे असें करितां करितां राघोबांची 'भरारी' पेशव्यांच्या राज्यांत आली. तेव्हां "आतां आह्मी माघारें जातों. आतां तुमच्या मुलखांत रघुनाथराव

आले. याचा बंदोबस्त तुह्मीं राखावा." असें सांगून नवाब साहेब भागानगरास चालते जाहले. या बाबतींत **निजाम-मुल्मुखास** १ लाख रुपये मिळाले ह्मणतात. ही साक्षात् मर्दुमकी नव्हे, पण बाणेदारपणा विशेष दिसतो.

८ हा प्रकार जाहल्यानंतर मराठे व मोंगल ह्यांच्यामध्यें भेदाभेदच उरला नाहीं; एवढेंच नव्हे, तर "आपण वडील-पणें येऊन समारंभ केला पाहिजे." असें पत्र नबाबांस सवाई माधवराव यांच्या विवाहसमयीं व आहेर देणें घेणें सर्व यथासांग चाललें होतें. ह्मणजे पेशवे आणि निजाम यांच्यांत घरोबा चांगला वाढत चालला होता. आतां ह्याउपर उभयतांत कटकटी होणार नाहींत असा रंग दिसे. पण वाचाळता व आपल्या कर्तुत्वाचा फाजील दिमाख असला ह्मणजे काय काय अनर्थ घडतील याचा नेम नाहीं, आणि त्यांतून असले गृहस्थ थोर अधिकारावर असले ह्मणजे तर काय विचारूंच नये. मश्रू-न्मुलुख ह्मणून निजामचा दिवाण यावेळीं होता तो अशांपैकीं; 'ग' ची बाधा त्याला फार जाहलेली, आणि विनाशकाळ याव-याचा ह्मणजे अगोदर गर्व चढतो तशी याची अवस्था झाली. देण्याघेण्यासंबंधाचा कांहीं वाद पेशवे व निजाम यांमध्यें चालला होता, उभयतांच्या दरबारीं परस्परांचे वकील असत. **गोविंद-राव काळे** हे भागानगरीं पेशव्यांचे वकील. त्यांच्या मार्फत **नानाफडणिसानें** पुष्कळ फोड हिशेबाची करून देण्याचा प्रयत्न केला तरी **मश्रूस** त्याची समज पडेना. त्याच्या मनांत कांहींतरी पेशव्यांशीं कटकट काढून आपल्या आंगचें पाणी ब्राह्मणभाईस दाखवावें. ह्मणून तो ह्मणाला तुमच्या कारभा-र्यासच ह्मणावें याची फोड करून द्यावयास ये. एवढ्यावरच स्वारी थांबली नाहीं. निजामास त्यानें वरचेवर ह्मणत असावें,

पेशवे ह्मणजे काय कथा ! गांडीस लंगोटी, हातांत तुंबा देऊं आणि राख अंगास फांसून काशीकडे भिक मागत फिरावयास त्यांना लावूं. या सर्व गोष्टी पेशव्यांच्या कानीं येत पण प्रत्यक्ष पुरावा नसे. इतक्यांत एक दिवशीं सरकारवाड्यांत तमाशा जाहला त्यांत **सवाई माधवराव** आणि **नाना फडणीस** यांचीं सोंगें आणिलीं. तीं पाहतांच पेशव्यांचे वकील **गोविंदराव बापू** व **गोविंदराव मामा** उभे राहून आपल्या मकानांकडे जाऊं लागले. **मश्रुद्दोलानें** विचारलें "कां जातां" तेव्हां वकिलद्वयानें उत्तर दिलें "हा राजदरबार आहे. येथें आमच्या खाविंदांचीं सोंगें आलीं. आतां आमचे बसण्याची मजा नाहीं. आह्मांस आपणही आमच्या खावंदांप्रमाणेंच आहां; आह्मांस बसावयास आग्रह करूं नये. आतां या कचेरींत आह्मी सर्वांदेखतां सरकारास अर्ज करितों एवढा समजून ठेवावा. आमचे खाविंदांचीं सोंगें आपण तमाशांत आणविलीं आणि लोकांस दाखविलीं याचें उसनें आपलेकडील दिवाण वगैरे मंडळीना पुण्यांत नेऊन व दारोदार फिरवून लोकांस दाखवूं हें पक्कें समजावें. आह्मी असें करून दाखवूं तरच गोविंदराव काळे होऊं." आणि मग तडख घरीं चालते जाहले. आपआपलीं कामें कारकुनांस सांगून हे उभयतां वकील इत्थंभूत बातमी खुद्द **नानांस** समक्ष कळवावी ह्मणून **पुण्यास** आले. इकडे हा सर्व प्रकार पाहून नवाबाचें धाबें दणाणून गेलें. हे जाऊन पुण्यास पोहोंचतात न पोहोंचतात तोंच त्या उभय वकिलांस कितावती पोषाख वगैरे आपल्या मनुष्यांकडून पाठवून दिले आणि खुद्द पेशव्यांसही एक पत्र लिहिलें कीं "आह्मी आतां ह्मातारे झालों, आतां तुह्मीं आह्मांशीं लढावें ही गोष्ट तुह्मांस मुनासब नाहीं." शिवाय रदबदली करण्यास कांहीं वकील, पे-

शव्यांस एक उमदा पोषाख नजर देऊन पाठविले. पण त्यांची डाळ शिजली नाहीं. पेशव्यांनींही उलट पोषाख दिला आणि "काय तें आतां लौकरच कळेल" असा निरोप पाठविला. **काळे** प्रभृतीच्या आग्रहानें रणसंग्राम खास ठरला. **शिंदे, होळकर, गायकवाड, नागपूरकर** वगैरे तमाम सरदारांस पुण्यास दाखल होण्याबद्दलचीं पत्रें गेलीं आणि त्याप्रमाणें झाडून सर्व सरदार, देखत हुकूम पुण्यास दाखल झाले. पुण्यास श्रीमंतांकडे जिकडून तिकडून एकंदर सरदार शिपाई येऊन मिळाले, ते या प्रसंगींच. पुनः तसा योगायोग घडून आलाच नाहीं आणि खरें ह्मटलें असतां मराठ्यांच्या एकोप्याची आणि त्यांच्या मर्दुमकीची अखेर या मोहिमेनंतरच जाहली. ह्मणजे ही मोहिम फत्ते जाहल्यानंतर महाबलाढ्य महाराष्ट्र देशांत परस्पर विरोध माजून जो तो स्वतंत्र होऊं लागला, धनीचाकर यांतील प्रेमा गेला, न्याय अन्याय उरला नाहीं; आणि अखेर त्यांचे तेहीपण उरले नाहींत. उरलें तें नाम मात्र. वास्तव ही **खर्ड्या**ची मोहिम पंतप्रधानच्या प्रतापदिनकराच्या संध्या समयाची ह्मणण्यास हरकत नाहीं. असो. या गत गोष्टींचें स्मरण कोरड्या हळहळीस कारण होतें, ह्मणून तें टाळवेल तितकें विस्तारें करून लिहिण्याचें टाळावें हेंच बरें. पण त्याची आठवण बुजूं देतां कामा नये. पूर्वजांचा सदभिमान हवा. त्यांची नुसती फुशारकी नको. तसें होण्याची व वागण्याची ईर्षा हवी. असो, इकडे पुण्यास सर्व तयारी जाहली. सुदीन पाहून खाशा स्वारी सुद्धां मंडळी पुण्याहून निघण्याचा निश्चय ठरला. परंतु सेनाधिपती कोणास नेमावें याची पंचाईत पडली. **शिंद्यांस** द्यावें तर नव्याद-माचे, पदरीं शेणवी मंडळीचें प्राबल्य विशेष. नजराणा घेऊन नंतर वस्त्रें देऊं, अशी अट सरकारची पडली होती. शिवाय

होळकरांस राग यावयाचा. होळकरांस सांगावें तरी अडचण, ब्राह्मण मंडळीस सांगावें तर तमाम मराठे सरदारांत वैषम्य वाटणार. ब्राह्मणांत रणधुरंधर कायते पटवर्धन परशुराम भाऊ आणि विंचुरकर एवढेच. पैकीं विंचुरकर अनुभविक. तेव्हां काय करावें ही पंचाईत फार पडली. नागपूरकर सेनासुभे, बडोदेकर सेनाखासखेल, इंदुरकर होळकर, शिंदे अलिजाबहादर ही ठळक ठळक शूर मर्दानी व कैकवेळां सरकारसेवेखातर जिवावर उदार होऊन लढलेली मंडळी. त्यांचें मन दुखविणें इष्ट नव्हतें. तेव्हां त्यांस सेनाधिपत्य न सांगतां दुसऱ्या नवख्या व ताज्या दमाच्या चार दिवसांच्या वीरांस सांगावें तर तिकडूनही पंचाईत. ह्मणून नानांनीं पृथक् पृथक् एकेका सरदारास बोलावून या बद्दलची मसलत केली आणि सर्वांनुमतें परशुरामभाऊंसच अखेर सेनाधिपती केलें. आणि मग सर्व मराठेमंडळ मोठ्या जयघोषानें मोंगलांवर चाल करून जाण्यास निघालें. तिकडे नबाबांनींही तशीच तयारी चालविली. उभय सैन्यांची गांठ पडली खरड्याच्या मैदानांत. आपापली तयारी करण्यांतच उभय सैन्यें समोरासमोर पंधरा दिवसपर्यंत राहिलीं. एकेदिवशीं मराठ्यांकडील बारगीर गैरसावधपणानें वागत असतां मोंगलाचे बारगीर भेटले. त्या उभयतांत कटकट जाहली व मोंगलांच्या बारगिरांनीं मराठ्या बारगिरांचा मोड केला. कैकांस ठार मारलें, तेव्हां बाकीचे लोक पळत सुटले. तों तेथें रखवालीच्या पागा होत्या तेथपर्यंत हूल पडली कीं मोंगल फत्ते करून आले. त्या बरोबर जिकडे तिकडे धांदल उडाली. आणि एकच दंगा माजून राहिला. कांहीं पागेवाल्यांचा मोंगलांनीं मोड केला तेव्हां ते पळत माघारीं आले. बाबा फडके हें पाहतांच जरीपटका व

चाळीसहजार स्वार घेऊन मोंगलांवर तुटून पडले. पण बाबास लढाईचा प्रसंग पूर्वी कधीं माहित नव्हता, त्यामुळें ऐनप्रसंगीं ते घाबरले, आणि पळ काढून माघारे धांवत आले. त्यांस पाहून पेशव्यांचे भीष्माचार्य **परशुरामभाऊ** मोठ्या त्वेषानें चवताळून मोंगलांवर धांवून गेले. जरीपटक्याचा हत्ती मोंगलांनीं धरून नेला होता तो अगोदर **भाऊंनीं** फिरवून आणिला; आणि खऱ्या लढाईस तोंड दिलें. हा वेळपर्यंत उगीच मधल्यामध्यें गडबड उडून असा हा प्रकार जाहला होता. नानाफडणवीस या मोहिमेंत आले होते; त्यांस हें घडलें, एवढेंच वर्तमान सांडणीस्वारानें कळविलें; त्यासरशीं **फडणविसांच्या** तोंडचें पाणी पळालें. त्यांचा दम निघेना. आतां काय करावें ह्मणून फारच घाबरले. जवळ पन्नास साठ हजार शिपाई पठ्ठेशूर होते त्यांनीं **नानांस** घाबरलेलें पाहून ह्मटलें "इतके आपण घाबरलां कां? अजून लढाईचें तोंड पुरतें लागलें नाहीं तोंच आपण एवढे हवालदील होऊं नये. अशी मसलत करूं नये; हें नीट नाहीं. आह्मी आज पन्नास साठ हजार स्वार एक्या मांडीचे आहोंत. इतक्या फौजेनिशीं सारा मोंगल बुडवूं." पण कांहीं केल्यानें **नानांस** ह्मणून दम निघेना. त्यांचें मुख्य हत्यार काय तें कलमतें त्यांनीं चटकन काढिलें. आणि **शिंदे, होळकर, गायकवाड, नागपूरकर** इत्यादि ठळक ठळक मंडळीस भराभर चिठ्या लिहिल्या कीं, "मोंगलाची फौज सरकारच्या जरीपटक्यावर धांवली असतां अजून तुह्मी सारे स्वस्थ पाहतां यास काय ह्मणावें? आतां लढाईची तयारी करून नबाब आपले कबजांत आणावा." ह्या चिठ्या ज्याच्या त्यास मिळण्यापूर्वींच, सर्वांनीं लढाईची तयारी केली होती. **जिवबा बक्षी** निसबत सरकार शिंदे यांस चिठ्ठी पावतांच त्यांनीं परत कळविलें "थो-

डेंसें लढाईचें तोंड लागलें इतक्यामुळेंच सरकार घाबरून सांडणीस्वार रवाना केला त्यास हल्लीं विनंती लिहिली आहे. लढाईची सरशी करून नवाब **निजाम अल्लीखां** यास जिवंत धरून आणूं, किंवा डोकें कापून आणूं ? याची कायती आज्ञा व्हावी." खंडणी घेऊन **महादजी**च्या पश्चात वस्त्रें देण्याचा सरकारी मनसुबा पाहिला त्यावेळींच **जिवबा**नेंही आपण एकटे फत्ते करून येऊं, असें ह्मटलें होतें त्याचा हा अभिमान. फडणीस **नानां**नीं त्या विनंतीसही परत जबाब पाठविला कीं, "नवाबाचे जिवास धक्का न लागतां लढाई फत्ते करून ज्यांस आणावयाची गरज त्यांस आणावें." असो. शिंदे, होळकर, भोंसले वगैरे सरदार आपापल्या अफाट सेना घेऊन सपाटून निजामावर चालून गेले. तिकडे नवाबाच्या सैन्यानेंही मोठी शिकस्त केली. शिंद्याच्या कापूंतून "हरहर महादेव" होळकरांचा "उधो मल्हारी" पटवर्धन व पेशवे यांचाही "मोरया व हरहर महादेव" या आरोळ्या ऐकतांच सर्व सेना गर्भगळित होऊन गेली. शिंद्यांच्या तोफा, होळकरांच्या जेजाला, भोंसल्यांच्या बाणांचा मार, याखालीं मोंगलसेना बेजार जाहली. होळकरानें "लांडगेतोड" सुरू केली. गायकवाडाच्या समशेरीनें मोंगलसेनेस, दे माय धरणी ठाय असें केलें. सबंध प्रहरपर्यंत उभय सैन्यें मोठ्या निकरानें आपापल्या प्राणांची पर्वा न बाळगतां लढलीं; कोणीच पाय माघार घेईना, दोघेही पुढेंच पाऊल टाकीत. असा घोर रणसंग्राम माजला. इकडे **जिवबा बक्षी** यांनीं आपल्या तोफेचा मारा खास नवाबाच्या हत्तीवर सुरू केला. चारपांच गोळे येऊन आपल्या अंबारीवर धडकले, हें पाहतांच निजामाची स्वारी किंचित घाबरली. तों पुनः "हर हर महादेव"च्या गर्जनेनें मराठे जास्तच जोरानें तुटून पडले;

त्याबरोबर कचर मोंगलाच्या सैन्यानें खाल्ली. "हा वखत मोठा आला आहे. मराठे आतां लढाईस मागें हटत नाहींत" असा विचार करून, मोंगल हुजुरांनीं, माहतास हुकुम केला कीं माझा हत्ती किल्ल्याकडे वळीव आतां धडगत दिसत नाहीं. हुजुर मागें पाय काढून निसटण्यास पाहतात एवढें कळलें मात्र; मग काय विचारावें ? त्या स्वामिभक्त सेनेनें यजमानासारखाच आपणही क्रम आरंभिला ! समरांगणांतून निजाम सेना पळत सुटली. मराठ्यांची फत्ते जाहली. निजामसाहेब **खरड्याच्या** किल्ल्यांत शिरले. मराठ्यांनीं वेढा दिला. अन्नपाण्याची रसद बंद, अशा स्थितींत तीन दिवस जेमतेम निभावले. पुढें फार जेरीस येऊन **निजामांनीं** निरोप पाठविला कीं "जो मुलख तुह्मांस द्यावयाचा असेल तितका घेऊन आह्मांस काय ठेवावयाचा असेल तो ठेवावा." त्यावर पेशव्यांचें उत्तर गेलें. "द्यावयाचा तो मुलख आह्मी घेऊं, **मश्रुन्मुलुख** आमचे स्वाधीन करावा आणि स्वारीखर्च आमचा काय झाला असेल तो द्यावा. शिवाय खंडणी. आतां तुह्मांशीं दुसरें बोलणें बोलावयास राहिलें नाहीं." हा निरोप ऐकून निजामास फार वाईट वाटलें " खुदानें ऐसा वखत हमारेपर लाया, क्या करना ? ए बात इन्की हम, न सुने तो तह होता नहीं !" असें निजाम बोलले, तेव्हां मश्रूनें सांगितलें "मैं उनकेसाथ जाता हुं." पेशवे माझी अदब कमी करणार नाहींत. आणि नंतर त्याप्रमाणें ठरून उभयतांत तह झाला. पेशव्यांचें ह्मणणें निजामानें मान्य केलें; नंतर उभय सैन्यें परतलीं. यांत **नाना फडनीस** यांनीं आपण स्वतःकरितां शेंकडा दोन रुपये तहरीर–कमिशन–कायमपणें, आणि एकंदर राज्यावर देण्याचें निजामाकडून कबूल करून घेतलें, अशी हकीकत साधार आणि खाजगी मला कळली आहे. ह-

णजे पेशव्यांच्या समशेरीबरोबर नानांची लेखणी असे ! ही पेशव्यांची अखेरची मर्दुमकी. दिवट्या रावबाजीनें सर्वांच्या तोंडांस काळोखी लावून अखेर आपला, आपल्या कुळाचा, प्रांताचा आणि आपल्या देशाचाही घात करून घेतला ! खरोखर बाजीरावासारखा कपाळकरंटा, हतभागी, नामर्द आणि नादान त्याचा तोच. असो. आतां त्याबद्दल बोलणें कोरड्या हळहळीस आणि फाजील खंतीस व रिकाम्या वैतागास कारण, ह्मणून त्याची आठवणच नको.

जाहलें ! मर्दुमकीचा पहिला भाग सांगितला. पुढें दुसरा. पण हा वाचून त्याचा अभिमान यत्किंचित् जरी येईल तर माझ्या लिहिण्याचें सार्थक होईल आणि ही सेवा मानवेल तर अशीच सदोदित बजावीन.